# ३ लाखांच्या मुद्देमालासह दुचाकी चोरटा जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड/प्रतिनिधी**

नांदेड शहर व पुणे येथून दुचाकी चोरणाऱ्या २१ वर्षीय युवकाला स्थानिक गुन्हे शाखा पथकाने जेरबंद केले असून त्याच्याकडून ३ लाख ५ हजार रुपयांच्या ४ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

दि. ७ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील अधिकारी व अमलदार शहरात गस्तीवर होते. मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन या पथकाने अनिकेत ऊर्फ सोनु वुक्तरे (२१, रा. इंदिरानगर, वाडी (बु) ता. जि. नांदेड) यास ताब्यात घेतले. त्याला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने नांदेड व पुणे येथून वेगवेगळ्या कंपनीच्या ४ दुचाकी चोरल्याची कबुली दिली. त्याच्याकडून ३ लाख ५ हजार रुपये किंमतीच्या ४ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या. या दुचाकी प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाणे, तळेगाव दाभाडे जि.पुणे १ असे चोरीचे २ गुन्हे उघड झाले आहेत.जप्त करण्यात आलेला मुद्देमाल आणि आरोपीला भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हवाली करण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, सपोनि रवी वाहुळे, पोउपनिरीक्षक सचिन सोनवणे, पोहेकॉ गुंडेराव करले, अफजल पठाण, वालाजी तेलंग, संजीव जिंकलवाड, देवा चव्हाण, ज्वालासिंघ बावरी यांनी ही कारवाई केली..

# दुचाकी चोरणाऱ्यास अटक

## चार जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

**सकाळ वृत्तसेवा**

नांदेड, ता. ७ : स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी (ता. सात) एका दुचाकी चोरास अटक केली असून त्याच्याकडील तीन लाख पाच हजार रुपयांच्या चार दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. याबाबत भाग्यनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून पुढील तपासासाठी त्याला भाग्यनगर ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक जगदीश भंडरवार यांना दिलेल्या आदेशानुसार वेगवेगळी पथके तयार करुन गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेणे सुरू होते. दरम्यान, पथकाला पेट्रोलिंग करत असताना अनिकेत ऊर्फ सोनु सदाशिव बुक्तरे (वय २१, रा. इंदीरानगर, वाडी (बुद्रुक), नांदेड) हा सापडला. त्यास ताब्यात घेऊन तपास केला असता, त्याच्याकडून चार दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत. त्याने नांदेड शहरातुन व पुणे येथुन चोरी केल्याचे सांगितले. त्यावरुन भाग्यनगर पोलिस ठाणे आणि तळेगाव दाभाडे पोलिस ठाणे असे एकुण दोन चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरील कामगिरी पोलिस अधीक्षक कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, खंडेराव धरणे, पोलिस निरीक्षक भंडरवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक रवी वाहुळे, फौजदार सचिन सोनवणे, पोलिस जमादार गुंडेराव करले, अफजल पठाण, बालाजी तेलंग, संजीव जिंकलवाड, देवा चव्हाण, ज्वालासिंघ बावरी आदींनी पार पाडली.